COMPUAGE INFOCOM LIMITED (Under CIRP)

CIN: L99999MH1999PLC135914
Regd. Office: 309, A to Z Industrial Estate, Ganpatrao Kadam Marg, Lower Parel, Mumbai, Maharashtra, 400013 Tel No: 022-31706903
E-mail: info@compuageindia.com Website: www.compuageindia.com

NOTICE OF THE 26th ANNUAL GENERAL MEETING OF THE COMPANY AND E-VOTING

NOTICE IS HEREBY GIVEN THAT the 26th Annual General Meeting (AGM) of the Company for the financial year 2024-25 will be held through Video Conferencing ("VC")/Other Audio-Visual Means ("OAVM") on Tuesday, 17th March, 2026, at 12.30 PM IST in compliance with all the applicable provisions of the Companies Act, 2013 and the rules made there under as well as Securities and Exchange Board of India ("SEBI") (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, ('LODR') read with General Circular No.14/2020 dated 08th April, 2020, General Circular No. 17/2020 dated 13th April, 2020 and General Circular No.20/2020 dated 05th May, 2020 followed by MCA Circular No. 02/2021 dated January 13, 2021, MCA Circular No. 02/2021 dated December 14, 2021, MCA Circular No. 02/2021 dated May 05, 2022, January 05, 2023, October 7, 2023 09/2024 dated September 19, 2024, 03/2025 dated September 22, 2025 (collectively referred to as "MCA Circulars") and other applicable Circulars issued by the Ministry of Corporate Affairs ("MCA") and SEBI ('other relevant Circulars") without the physical presence of the members at a common venue to transact the Business set out in the Notice calling AGM. Members will be able to attend the AGM through VC/OAVM. Members participating through the VC/OAVM facility shall be reckoned for the purpose of quorum under section 103 of the Companies Act, 2013.

In compliance with the relevant circulars, the Notice of the AGM and the Financial Statements for the financial year 2024-25, along with the Board's Report, Auditor's Report and other documents required to be attached thereto, has been sent to all the members of the Company whose email address are registered with the Company/Depository Participant(s). The aforesaid documents is also available on the company's website i.e. www.compuageindia.com and on the website of the Stock Exchanges i.e., BSE & NSE www.bseindia.com & www.nseindia.com respectively.

Pursuant to provisions of Section 108 of Companies Act 2013 read with rule 20 of the Companies Management and Administration Rules 2014, as amended and Regulation 44 of SEBI (LODR) Regulations 2015 & Secretarial standards on General meeting (SS-2), the Company is pleased to provide its members the electronic facility (remote e-voting) to transact all the business mentioned in the notice MUFG Intime India Private Limited (Formerly Link Intime India Private Limited) (MIIPL).

All the members are informed that: -

(a) The cut off date for determining the eligibility of the members to vote by remote e voting or voting at the AGM is 10th March, 2026.
(b) The remote E-voting shall commence on Friday, 13th March, 2026 at 09.00 a.m. IST and end on Monday, 16th March, 2026 at 05:00 p.m. IST. The remote e-voting shall not be allowed beyond the said date and time.
(c) A person, who has acquired shares and become member of the Company after the email sending date i.e., Monday, 23rd February, 2026 and holding shares on cut-off date i.e., Tuesday 10th March, 2026 may obtain the procedure to login by sending request at (denotices@in.mpms.mufg.com However, if the person is already registered with MIIPL for remote e-voting than he/she can use his/her existing login ID/user ID and password for casting the vote.
(d) Members holding shares in dematerialized mode, who have not registered/ updated their email addresses, are requested to register/update their email addresses with depository participants with whom they maintain their demat account.
(e) The Notice of AGM is available on the website of the Company, i.e., www.compuageindia.com and the website of MUFG Intime at https://instavote.linkintime.co.in and may also be accessed on the websites of the stock exchanges where the shares of the Company are listed, i.e., www.bseindia.com and www.nseindia.com. The procedure for remote e-Voting/attend meeting is available in the Notice of the AGM as well as on the website of MUFG Intime. In case of any queries pertaining to e-voting, member can email to enotices@in.mpms.mufg.com or please refer the FAQ available on the website of MUFG Intime.
(g) Members are requested to carefully read all the notes set out in the Notice of the AGM and in particular, instruction for joining the AGM, manner of casting vote through remote e- voting or through e- voting during the AGM.

FOR COMPUAGE INFOCOM LIMITED (Under CIRP)
Sd/-
Gajesh Labhchand Jain
Resolution Professional in the matter of M/s Compuage Infocom Limited vide Hon'ble NCLT order dated 29.04.2024, received on 09.05.2024.
Reg. No.: IBBI/IPA-001/IP-P-01697/2019 -2020/12588
AFA Validity: 31/12/2026

Place: Mumbai
Date: 23rd February, 2026

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to public at large that, upon instructions of my clients, I am investigating the right, title and interest of M/s. Prakash Sanitation (hereinafter referred to as the **"Owner"**) a partnership firm having its registered office at 20/24, Shaheed Bhagat Singh Road, Mumbai 400 023, in respect of a Commercial Unit (i) No. 213, admeasuring 62.28 square meters equivalent to 670.38 square feet (carpet area), along with (ii) Loft admeasuring 22.80 square meters equivalent to 245.41 square feet (carpet area) admeasuring in aggregate 85.08 square meters equivalent to 916 square feet (approx.) on the 2nd floor (collectively **"said Unit"**) of the building known as 'Varma Chambers' in Varma Chambers Premises Co-operative Society Limited (**"said Society"**) situated at: 11, Homji Street, Fort, Mumbai – 400001 together with 5 (Five) Fully-Paid up shares of Rupees 50/- each bearing distinctive Nos. 281 to 285 (both inclusive) embodied in Share Certificate No.58 dated 25 October 1989 issued by the said Society (**"said Shares"**). The said Unit and the said Shares are hereinafter collectively referred to as the **"said Premises"**, the details of which are more particularly described in the **Schedule** hereinunder written.

The Owner has informed my clients that the said Unit has been given on leave and license basis to Mr. Ramesh Ramnath Dube Patil under a leave and license agreement dated 23 April 2024.

Subject to the above, any Person, Bank, Non-Banking Financial Institution, or any other person having any claim, demand, right, benefit or interest in respect of the said Premises or part thereof by way of sale, transfer, assignment, exchange, gift, right, interest, share, lease, sub-lease, tenancy, sub-tenancy, sub-license, mortgage, equitable mortgage, lien, charge, hypothecation, encumbrance, covenant, trust, pre-emption, possession, agreement, lis pendens, settlement, Memorandum of Understanding/Term Sheet or Promissory Note, Bill of Exchange, Loan Agreement, Corporate Guarantee, Personal Guarantee or any other written understanding, or decree or order of any Court of Law, Tribunal, Arbitration or otherwise howsoever is required to make the same known in writing supported by authenticated documents to be delivered to **Mr. Amit Mehta**, Advocate & Solicitor, Office No. 5, 1st Floor, 32, Rajabahadur Mansion in Rajabahadur Compound, Ambalal Doshi Marg, Opp. Bombay Stock Exchange, Mumbai 400 023 together with scanned copies emailed to adv.amitmehta@gmail.com, within **Fourteen (14)** days from the date of publication of this notice, otherwise, all such claims shall not be binding upon my clients.

THE SCHEDULE ABOVE REFERRED TO

(Details of the said Premises)

Commercial Unit No.213, admeasuring 62.28 square meters equivalent to 670.38 square feet (carpet area), along with Loft admeasuring 22.80 square meters equivalent to 245.41 square feet (carpet area) admeasuring in aggregate 85.08 square meters equivalent to 916 square feet (approx.) on the 2nd floor of the building known as 'Varma Chambers' in Varma Chambers Premises Co-oper

प्रातःकाल
www.pratahkal.com

संपादकीय

ट्रम्प यांच्या 'टॅरिफ' राजकारणास चपराक

सत्ता कितीही ताकदवान असली, तरी ती संविधानाच्या चौकटीतच राहिली पाहिजे, हा धडा अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा ठासून दिला आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक आणि एकतर्फी टॅरिफ धोरणाला न्यायालयाने दिलेला दणका हा केवळ आर्थिक निर्णय नाही, तर तो लोकशाहीतील संस्थात्मक संतुलनाचा स्पष्ट संदेश आहे. राष्ट्रीय आणीबाणीच्या नावाखाली संपूर्ण जगावर कर लादण्याचा अधिकार कार्यकारी सत्तेला नाही, हे या निकालातून ठळकपणे समोर आले आहे. जागतिक अर्थकारणावर अनिश्चिततेची छाया टाकणाऱ्या टॅरिफ राजकारणाला मिळालेली ही चपराक दूरगामी परिणाम घडवणारी ठरणार आहे.

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या महत्त्वाकांक्षी आणि तितक्याच वादग्रस्त 'ग्लोबल टॅरिफ' धोरणाला ६ विरुद्ध ३ मतांनी दिलेला दणदणीत धक्का, हा जागतिक अर्थकारणातील एक अत्यंत निर्णायक वळणबिंदू ठरला आहे. हा निकाल केवळ एका आर्थिक धोरणाचा पराभव नसून, तो अमेरिकन लोकशाहीच्या 'सत्ताविभाजन' या मूलभूत तत्त्वाचा ऐतिहासिक विजय आहे. राष्ट्राध्यक्षांनी राष्ट्रीय आणीबाणीच्या विशेषाधिकारांचा वापर करून संपूर्ण जगावर लादलेले व्यापक व्यापार शुल्क हे त्यांच्या अधिकारांच्या सीमा ओलांडणारे होते, यावर न्यायालयाने या निकालाद्वारे शिक्कामोर्तब केले आहे. १९७७ च्या 'इंटरनॅशनल इमर्जन्सी इकॉनॉमिक पॉवर्स ॲक्ट'चा आधार घेऊन राष्ट्राध्यक्षांना अमर्याद कर लादण्याचा कोणताही अधिकार संविधानिक चौकटीत बसत नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. कर आणि शुल्क निश्चित करणे हा पूर्णतः अमेरिकन काँग्रेसचा म्हणजे विधिमंडळाचा मूलभूत अधिकार असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केल्यामुळे, कार्यकारी आदेशांच्या जोरावर मनमानी कारभार करणाऱ्या प्रवृत्तींना लगाम बसला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या व्यापार तुटीला 'असामान्य आणि विलक्षण धोका' घोषित करत जगभरातील वस्तूंवर १० ते ५० टक्क्यांपर्यंत शुल्क लादले होते. चीन, मेक्सिको आणि कॅनडा यांसारख्या शेजारील देशांवर अंमली पदार्थांच्या तस्करीचे आरोप करून त्यांच्यावर आर्थिक निर्बंध लादण्याचा प्रयत्न झाला. मात्र, केवळ आर्थिक असमतोल किंवा व्यापारातील तूट ही खरोखरच राष्ट्रीय आणीबाणी ठरू शकते का, हा कळीचा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. कायद्याचा इतका व्यापक आणि सोयीस्कर अर्थ लावणे हे लोकशाही व्यवस्थेसाठी घातक असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. या निकालाचे पडसाद उमटताच वॉल स्ट्रीटवरील गुंतवणूकदारांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिली असून, यामुळे जागतिक बाजारात पसरलेली धोरणात्मक अनिश्चितता काही प्रमाणात कमी होण्याची चिन्हे आहेत. गेल्या वर्षभरात या टॅरिफमुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली होती, अनेक कंपन्यांना आपले उत्पादन केंद्र बदलण्यास भाग पाडले गेले होते. जरी या निर्णयानंतर लगेचच प्रत्यक्ष व्यापारात मोठे बदल होणार नसले, तरी अनिश्चिततेचे मळभ दूर होण्यास नक्कीच मदत होईल.

भारतासाठी या घडामोडींचे महत्त्व अत्यंत संवेदनशील आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतरही ट्रम्प यांनी आपल्या चिरपरिचित शैलीत "काहीही बदलललेले नाही, भारत टॅरिफ भरेलच" अशी दर्पोक्ती केली आहे. भारत-अमेरिका व्यापार करारानुसार भारतीय वस्तूंवरील शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणल्याचा दावा व्हाइट हाऊसकडून केला जात असला, तरी या १८ टक्के दराला आता कोणता कायदेशीर आधार उरला आहे, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. जर सर्वोच्च न्यायालयाने आणीबाणीच्या कायद्यांतर्गत लावलेले टॅरिफ बेकायदा ठरवले असतील, तर ट्रम्प प्रशासन आता १९७४ च्या ट्रेड ॲक्टमधील 'कलम १२२' चा आधार घेण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, हा नवा कायदेशीर डावपेच न्यायालयाच्या पुढच्या कसोटीवर किती काळ टिकेल, याबद्दल साशंकता आहे. भारताला दिलेली ही सवलत खरोखरच सवलत आहे की नव्या कायद्याच्या कचाट्यात अडकवण्याचा प्रयत्न, हे आगामी काळात स्पष्ट होईल.

ट्रम्प यांनी आपल्या वक्तव्यात केवळ व्यापारावरच भाष्य केले नाही, तर भारत-पाकिस्तान तणाव, रशियाकडून भारताची तेल खरेदी आणि २०० टक्के टॅरिफची धमकी देऊन आपण युद्ध थांबवल्याचे अजब दावे पुन्हा एकदा मांडले आहेत. अशा प्रकारची विधाने भारतासारख्या सार्वभौम राष्ट्रासाठी अत्यंत चिंतेची आहेत. परराष्ट्र धोरण, ऊर्जा सुरक्षा आणि संरक्षणासारखे विषय हे पूर्णतः भारताचे अंतर्गत आणि सार्वभौम अधिकार आहेत. व्यापार आणि राष्ट्रीय सुरक्षा यांना एकाच राजकीय भाषणात भेसळ करून मांडण्याची ट्रम्प यांची ही पद्धत दीर्घकालीन आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी घातक ठरू शकते. राष्ट्राध्यक्ष कितीही लोकप्रिय असले तरी त्यांचे अधिकार संविधानाच्या मर्यादितच असायला हवेत, हा संदेश या निकालाने जागतिक लोकशाही व्यवस्थेला दिला आहे. अमेरिकन काँग्रेसची स्पष्ट संमती नसताना केवळ कार्यकारी आदेशांच्या बळावर जागतिक आर्थिक धोरण राबवणे हे न्यायालयाला अमान्य आहे, हे या निकालावरून सिद्ध झाले आहे. ट्रम्प समर्थक जरी असा युक्तिवाद करत असले की, टॅरिफमुळे अमेरिकन उद्योगांचे संरक्षण होते आणि रोजगार वाढतात; तरीही टीकाकारांच्या मते याचा अंतिम बोजा सामान्य ग्राहकांना आणि लघुउद्योगांनाच सहन करावा लागतो. 'वी पे द टॅरिफ्स' सारख्या संघटनांनी याआधीच या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला आहे. हा लढा केवळ पैशांचा नसून तो सत्तेच्या केंद्रीकरणाविरुद्धचा आहे. जर राष्ट्राध्यक्षांना आणीबाणीच्या नावाखाली कोणतेही आर्थिक निर्णय घेण्याची मुभा मिळाली, तर लोकशाहीचा मूळ ढाचाच कोसळण्याची भीती आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय म्हणजे सत्तेच्या त्या केंद्रीकरणाला बसलेला एक मोठा हादरा आहे. मात्र, हा वाद इथेच संपणार नाही; व्हाइट हाऊसने आधीच नव्या कायदेशीर तरतुदींचा आधार घेत सर्व राष्ट्रांना १० टक्के शुल्क लावण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे हा संघर्ष आता नव्या रूपात न्यायालयासमोर येण्याची शक्यता आहे. भारतासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थेसाठी ही परिस्थिती अत्यंत कसरतीची ठरणार आहे. एका बाजूला अमेरिकेसोबतचे सामरिक संबंध, तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीचे सहकार्य टिकवून ठेवणे आवश्यक आहे, तर दुसऱ्या बाजूला रशियाशी असलेले ऊर्जा संबंध आणि स्वतःची परराष्ट्र स्वायत्तता जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

अमेरिकेतील हा न्यायालयीन निकाल लोकशाहीतील संस्थात्मक संतुलनाचा एक उत्तम वस्तुपाठ आहे. आर्थिक राष्ट्रवाद आणि संरक्षणवादाच्या लाटेतही घटनात्मक मर्यादांचे उल्लंघन होऊ शकत नाही, हा धडा या निमित्ताने सर्वच लोकशाही राष्ट्रांच्या राज्यकर्त्यांनी घेण्यासारखा आहे. निकालानंतरही ट्रम्प यांनी दाखवलेली आक्रमकता आणि दर्पोक्ती ही लोकशाही मूल्यांचा आदर न करणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या वृत्तीचेच दर्शन घडवते. हा निकाल केवळ ट्रम्प यांच्या धोरणांपुरता मर्यादित नाही, तर तो सत्तेच्या केंद्रीकरणाविरोधातील एक स्पष्ट इशारा आहे. आर्थिक राष्ट्रवादाच्या नावाखाली घटनात्मक मर्यादा ओलांडल्या, तर न्यायसंस्था हस्तक्षेप करतील, हे यानिमित्ताने सिद्ध झाले आहे. भारतासारख्या देशांसाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे, कारण तो सार्वभौम अधिकार, परराष्ट्र स्वायत्तता आणि कायद्याचे राज्य यांचे महत्त्व अधोरेखित करतो. टॅरिफची भाषा बदलू शकते, कायदेशीर डावपेच नवे असू शकतात, पण संविधानाच्या चौकटीबाहेर सत्ता टिकू शकत नाही. जेव्हा उन्मत्त धोरणांवर घटनात्मक नियंत्रण बसते, तेव्हाच लोकशाही खऱ्या अर्थाने विजयी ठरते.

प्रा. डॉ. स्मिता अवचार : समाजशास्त्राच्या सेवाव्रतापासून ते जीवनगौरवापर्यंत

❒ राजेंद्र बगाटे

महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्रीय परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांचे कार्य केवळ विद्यापीठीय चौकटीत मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या वैचारिक जडणघडणीचा अविभाज्य भाग बनते. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम आहेत. समाजशास्त्र या विषयाला मानवी संवेदनशीलतेची, सामाजिक बांधिलकीची आणि शास्त्रीय काटेकोरतेची जोड देत त्यांनी जे दीर्घकालीन कार्य केले आहे, त्याची दखल घेत महाराष्ट्रातील मराठी समाजशास्त्र परिषद यांच्यातर्फे देण्यात येणारा २०२५-२६ चा जीवन गौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. दि. १७-१८ फेब्रुवारी रोजी नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर, जि. नाशिक येथे आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३५व्या राष्ट्रीय अधिवेशनात हा सन्मान मराठी समाजशास्त्र परिषेदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक आणि भारतीय समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीप्ती रंजन साहू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आणि महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्र क्षेत्रात एक गौरवशाली क्षण नोंदवला गेला आहे. हा पुरस्कार केवळ एका प्राध्यापिकेच्या प्रदीर्घ सेवेला दिलेली औपचारिक मान्यता नाही, तर समाजशास्त्र या विषयाच्या सामाजिक उपयोगितेला दिलेली दाद आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना संशोधनाच्या केंद्रस्थानी ठेवून समाजशास्त्राला 'माणसांशी जोडलेला विषय' बनवण्याचे कार्य प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी आयुष्यभर केले. त्यामुळेच जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा शेवट नसून, त्यांच्या सेवाव्रताची सार्वजनिक कबुली आहे.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचा शैक्षणिक प्रवास हा सातत्य, चिकाटी आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांचा सुंदर संगम आहे. एम.ए., एम.फिल., डी.एच.ई. आणि पीएच.डी. या शैक्षणिक टप्प्यांतून त्यांनी समाजशास्त्राच्या मूलभूत संकल्पना, सिद्धांत आणि संशोधन पद्धती यांचे सखोल ज्ञान प्राप्त केले. मात्र, त्यांच्या शिक्षणाचा उद्देश केवळ पदव्या मिळवणे हा कधीच नव्हता. समाज समजून घेणे, समाजातील प्रश्न ओळखणे आणि त्या प्रश्नांवर शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणे, हा त्यांच्या अभ्यासाचा खरा गाभा राहिला.

समाजशास्त्र हा विषय त्यांनी केवळ सैद्धांतिक पातळीवर न ठेवता तो समाजाशी संवाद साधणारा बनवला. सामाजिक बदल, विकास प्रक्रिया, कुटुंबसंस्था, लिंगभाव, स्त्री-पुरुष संबंध, वृद्धत्व, शहरीकरण आणि ग्रामीण वास्तव या सर्व विषयांकडे त्यांनी संवेदनशीलतेने आणि वस्तुनिष्ठतेने पाहिले. त्यामुळेच त्यांचा शैक्षणिक प्रवास हा 'पुस्तकांतील समाज' आणि 'प्रत्यक्षातील समाज' यांच्यातील दरी भरून काढणारा ठरतो. त्यांचे दीर्घकालीन अध्यापन कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील समाजशास्त्र विभागाशी निगडित आहे. विद्यापीठीय प्राध्यापिका आणि विभागप्रमुख म्हणून त्यांनी पदव्युत्तर स्तरावर समाजशास्त्र विषयाचे अध्यापन केले. वर्गखोलीतील त्यांचे अध्यापन हे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर विद्यार्थ्यांमध्ये समाजाकडे पाहण्याची चिकित्सक दृष्टी निर्माण करणारे होते. सामाजिक घटनांचे विश्लेषण, प्रत्यक्ष उदाहरणे, क्षेत्रकार्याचे अनुभव आणि संशोधनातील शिस्त या सर्वांचा समन्वय त्यांच्या अध्यापनात दिसून येतो. समाजशास्त्र शिकवताना त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला, निरीक्षण करायला आणि निष्कर्ष काढायला शिकवले. 'समाजशास्त्र म्हणजे केवळ उत्तरांचा संच नव्हे, तर प्रश्न विचारण्याची शिस्त आहे,' ही भूमिका त्यांच्या अध्यापनातून सातत्याने व्यक्त होत राहिली. त्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ परीक्षाभिमुख तयारी नव्हे, तर संशोधनाभिमुख विचारसरणी विकसित झाली.

अध्यापनाबरोबरच संशोधन हे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांच्या शैक्षणिक जीवनाचे मुख्य केंद्र राहिले. समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, विकासाचे समाजशास्त्र, लिंगभाव आणि समाज तसेच वृद्धत्वाचे समाजशास्त्र ही त्यांची विशेष अभ्यासक्षेत्रे आहेत. या क्षेत्रांतील त्यांचे संशोधन केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेले आहे. कौटुंबिक बदल, शहरीकरण, औद्योगिकीकरण, महिलांचे सक्षमीकरण, वृद्धांचे प्रश्न, कौटुंबिक हिंसाचार आणि दारूबंदी चळवळ यांसारख्या विषयांवर त्यांनी केलेले संशोधन समाजातील बदलत्या प्रक्रिया स्पष्ट करणारे ठरत आहे.

विकासाचे समाजशास्त्र या क्षेत्रात त्यांनी विकास प्रक्रियेचा मानवी पैलू अधोरेखित केला. विकास म्हणजे केवळ आर्थिक वाढ नसून सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवी सन्मान यांचा समतोल असावा, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. ग्रामीण आणि शहरी समाजातील विकासातील तफावत, स्वयं-सहायता गटांचे सामाजिक परिणाम आणि महिलांचे सक्षमीकरण यावरील त्यांच्या संशोधनातून विकासाच्या संकल्पनेला व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे.

लिंगभाव आणि समाज या विषयावर त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ कायदेशीर तरतुदींमध्ये मर्यादित न राहता ती सामाजिक व्यवहारात कशी प्रकट होते, याचा त्यांनी सखोल अभ्यास केला. महिलांवरील हिंसाचार, कौटुंबिक नातेसंबंध, कामगार क्षेत्रातील महिलांची स्थिती आणि दारूबंदी चळवळीत महिलांची भूमिका अशा विषयांवरील त्यांच्या संशोधनातून लिंगभाव असमानतेची संरचनात्मक कारणे स्पष्ट झाली आहेत. त्यांच्या लेखनात स्त्री ही केवळ अभ्यासविषय न राहता सामाजिक परिवर्तनाची सक्रिय घटक म्हणून समोर आली आहे.

वृद्धत्वाचे समाजशास्त्र हा त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा आयाम आहे. बदलत्या कुटुंबव्यवस्थेमुळे वृद्धांच्या जीवनावर होणारे परिणाम, वृद्धाश्रमांची वाढ, वृद्धांचे सामाजिक-मानसिक प्रश्न आणि कौटुंबिक आधाराचा अभाव या विषयांवरील त्यांच्या संशोधनाने वृद्धत्वाच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले. वृद्ध ही केवळ कल्याणकारी योजनांची लक्ष्यगट नसून सन्मानाने जगण्याचा हक्क असलेली व्यक्ती आहे, ही भूमिका त्यांच्या संशोधनातून ठळकपणे व्यक्त झाली आहे. संशोधन मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. एम. ए., एम.फिल. आणि पीएच.डी., आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) स्तरावर त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. या संशोधन प्रबंधांचे विषय पाहिले, तर समाजातील विविध घटकांचे जीवनविश्व उलगडताना दिसते.

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

झोनल स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी शाखा :
मेहेर चेंबर, तळमजला, डॉ. सुंदरलाल बहल मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४००००१. फोन : ०२२-४३६८३८०१/८०२/८०३
ईमेल : armbom@bankofbaroda.co.in

परिशिष्ट २
हमीदाराला सूचना
(सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३ च्या उपकलम (२) अंतर्गत)

ठिकाण: मुंबई
तारीख: १०.०२.२०२६

प्रति,
१. श्री हितेश परमानंद असरानी (जमीनदार/गहाणखत)
२. कु. निशा असरानी (जामीनदार)
फ्लॅट क्रमांक/कार्यालय क्रमांक सी-११०, क्लासिक सेंटर, प्लॉट क्रमांक २६, महाल इंडस्ट्रियल इस्टेट, पेपर बॉक्स इंडस्ट्रीजवळ, महाकाली केव्हज रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३ आणि ४, गोल्डन व्ह्यू, पहिला मजला, सुंदर नगर, रोड क्रमांक २, कलिना, सांताक्रूझ पूर्व, मुंबई -४०००९८.
३. श्री. पंकज रमेशचंद्र व्यास (जमीनदार/गहाणखत)
४. कु. वैशाली पंकज व्यास (जामीनदार/गहाणखतदार)
फ्लॅट क्रमांक ४०७, चौथा मजला, बी-विंग, सत्यम कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, लिंक रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९१
महोदया/ प्रिय महोदय,
विषय : वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत जारी केलेली सूचना.
प्रश्न : मेसर्स ॲपल लाईफकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडला देण्यात आलेल्या क्रेडिट सुविधांसाठी तुमची हमी.
१. तुम्हाला माहिती आहेच की, तुमच्याकडे २८.०२.२०१७ आणि ३०.०३.२०२१ च्या हमीनुसार,सर्व पैशांच्या मागणीनुसार हमी दिलेली देयके आणि मेसर्स ॲपल लाईफकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने आमच्याकडे देय असलेली किंवा केलेली सर्व जबाबदारी आणि दायित्वे पूर्ण करणे, ज्यावर व्याजासह रु. ५,००,००,०००.०० ची एकूण क्रेडिट मर्यादा आहे, जी हमी दस्तऐवजात विशेषतः नमूद केली आहे. ३०.०३.२०२१ रोजी कर्जाच्या पावती पत्राद्वारे तुम्ही ३१.०३.२०२१ रोजी बँकेला तुमचे रु. ५,१३,००,०००/- इतके दायित्व मान्य केले आहे. कर्जदाराचे दायित्व सुरक्षित करण्यासाठी तुम्ही आम्हाला खालील सिक्युरिटीज देखील प्रदान केल्या आहेत :

सिक्युरिटीजच्या संक्षिप्त वर्णनासह सुरक्षा करार

१. श्री. हितेश परमानंद आश्रानी यांच्या नावावर २९५३.७८ चौ. मीटर क्षेत्रफळ असलेला जमीनीचा प्लॉट (प्लॉट क्रमांक १०,१५,१६,१७,१८) सर्व्हे क्र. ४०५/१ भाग + १बी, गाव खराडा, तालूका शहापूर, जिल्हा ठाणे ४२१ ६०१, मोज. २९५३.७८ चौ. मीटर.
२. फ्लॅट क्रमांक ४०७, चौथा मजला, बी विंग, ४०.०७ चौ. मीटर (कार्पेट), सत्यम सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड, एकसर गाव, लिंक रोड येथे, एमएचबी पोस्ट ऑफिससमोर, जयराज नगर जवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१, श्री. पंकज रमेशचंद्र व्यास आणि श्रीमती वैशाली पंकज व्यास यांचे आहे.

२. आम्हाला तुम्हाला कळवायचे आहे की कर्जदाराने त्याच्या देणग्या भरण्यात चूक केली आहे आणि परिणामी त्याचे खाते ३०.०१.२०२३ रोजी नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत १०.०२.२०२६ रोजीच्या सूचनेची प्रत आम्ही कर्जदाराला पाठवली आहे. कर्जदाराने चूक केली असल्याने, हमीच्या बाबतीत तुम्ही आम्हाला कर्ज/क्रेडिट सुविधांची थकबाकी असलेली रक्कम (०८.०२.२०२६ पर्यंत व्याजासह) रु. ७,१६,३२,५८३.७७ (रुपये सात कोटी सोळा लाख बत्तीस हजार पाचशे त्र्याऐंशी व सत्याहत्तर पैसे) आणि च्या इतर/कायदेशीर शुल्कासह देण्यास जबाबदार आहात रु. २,६१,२००/- पर्यंत देयकाच्या तारखेपर्यंत आणि आम्ही हमीची विनंती करतो आणि तुम्हाला या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत ही रक्कम भरण्याचे आवाहन करतो. कृपया लक्षात ठेवा की कर्जदाराला देण्यात आलेल्या १०.०२.२०२६ च्या जोडलेल्या सूचनेत (प्रत जोडलेली आहे) नमूद केलेल्या दराने इतर/कायदेशीर शुल्कांसह व्याज जमा होत राहील.
३. आम्ही तुम्हाला हे देखील कळवू इच्छितो की कर्जदाराने कर्ज आणि ॲडव्हान्सची देय परतफेड करण्यासाठी तुमच्या हमी दायित्वांना सुरक्षित करण्यासाठी तुम्ही दिलेल्या सुरक्षिततेच्या संदर्भात, ६० दिवसांची ही सूचना कृपया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या उप-कलम (२) अंतर्गत सूचना म्हणून मानली जाऊ शकते. आम्ही तुम्हाला असेही सूचना देतो की पेमेंटच्या तारखेपर्यंत वरील रक्कम व्याजासह भरण्यात अयशस्वी झाल्यास, आम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अंतर्गत सर्व किंवा कोणतेही अधिकार वापरण्यास स्वातंत्र्य असेल, जे कृपया लक्षात ठेवा.
४. आम्ही तुमचे लक्ष वेधतो की सदर कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (१३) कडे, ज्याच्या संदर्भात तुम्हाला वरील परिच्छेद १ मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचे विक्री, भाडेपट्टा किंवा इतर मार्गांनी (सामान्य व्यवसायाव्यतिरिक्त) हस्तांतरण करण्यास मनाई आहे, आमची पूर्व लेखी संमती घेतल्याशिवाय. आम्ही असे जोडू शकतो की सदर कायद्याच्या कलम १३ (१३) मध्ये समाविष्ट असलेल्या वरील तरतुदीचे पालन न करणे हा कायद्याच्या कलम २९ अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे.
५. **सार्वजनिक लिलाव/आमंत्रित कोटेशन/निविदा/खाजगी करारासाठी सूचना प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी, बँकेने केलेल्या सर्व खर्च, शुल्क आणि खर्चासह देय रक्कम तुम्हाला सादर केल्यास, तुम्ही सुरक्षित मालमत्ता परत मिळवू शकता, या कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) कडे आम्ही तुमचे लक्ष वेधतो. कृपया लक्षात ठेवा की वरील सूचना प्रकाशित झाल्यानंतर, सुरक्षित मालमत्ता परत मिळवण्याचा तुमचा अधिकार उपलब्ध राहणार नाही.**
६. कृपया लक्षात ठेवा की ही मागणी सूचना आमच्याकडे असलेल्या इतर कोणत्याही अधिकारांना किंवा उपायांना वगळण्याबद्दल कोणताही पूर्वग्रह नाही आणि ती आमच्याकडे असलेल्या रकमेच्या बाबतीत पुढील मागण्या करण्याच्या अधिकारात कोणत्याही मर्यादिशिवाय समाविष्ट आहे.
७. **येथे खाली स्वाक्षरी करणारे तुम्हाला कळवत आहेत की दिनांक ०३.०४.२०२४ रोजीचा १३(२) (मागणी सूचना) आणि दिनांक १८.०४.२०२३ रोजीचा १३(२) (मागणी सूचना) आज मागे घेण्यात येत आहे आणि आज एक नवीन १३(२) (मागणी सूचना) म्हणजेच ही सूचना जारी करत आहेत.**

तुमचा विश्वासू,
(विजय जैन)
सहाय्यक महाव्यवस्थापक
प्राधिकृत अधिकारी

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

झोनल स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी शाखा :
मेहेर चेंबर, तळमजला, डॉ. सुंदरलाल बहल मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४००००१. फोन : ०२२-४३६८३८०१/८०२/८०३
ईमेल : armbom@bankofbaroda.co.in

परिशिष्ट १
कर्जदाराला सूचना
(सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३ च्या उपकलम (२) अंतर्गत)

ठिकाण : मुंबई
तारीख : १०.०२.२०२६

प्रति,
१. **मेसर्स ॲपल लाईफकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार)**
फ्लॅट क्रमांक/कार्यालय क्रमांक सी-११०, क्लासिक सेंटर, प्लॉट क्रमांक २६, महाल इंडस्ट्रियल इस्टेट, पेपर बॉक्स इंडस्ट्रीजवळ, महाकाली केव्हज रोडजवळ, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३
२. **श्री. हितेश परमानंद असरानी (संचालक)**
३. **कु. निशा असरानी (संचालक)**
मेसर्स ॲपल लाईफकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
फ्लॅट क्रमांक/कार्यालय क्रमांक सी-११०, क्लासिक सेंटर, प्लॉट क्रमांक २६, महाल इंडस्ट्रियल इस्टेट, पेपर बॉक्स इंडस्ट्री जवळ, ऑफ महाकाली लेणी रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३ **आणि**
४, गोल्डन व्ह्यू, पहिला मजला, सुंदर नगर, रोड क्रमांक २, कलिना, सांताक्रूझ पूर्व, मुंबई-४०००९८
महोदया/ प्रिय महोदय,
विषय : वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत जारी केलेली सूचना.
प्रश्न : आमच्या विले पार्ले पश्चिम शाखेतील क्रेडिट सुविधा आता झोनल स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरीकडे शाखा, मुंबई हस्तांतरित केल्या आहेत.
आम्ही २४.०१.२०१७ रोजी विले पार्ले वेस्ट (पूर्वीची देना बँक) शाखेने विविध कर्ज सुविधांना मंजुरी आणि मंजुरीच्या अटी कळवणाऱ्या पत्राचा संदर्भ घेतो. वरील मंजुरीनुसार, तुम्ही पुढे सांगितल्याप्रमाणे, त्यासाठी सुरक्षा प्रदान केल्यानंतर कर्ज सुविधांचा लाभ घेतला आहे आणि त्यांचा वापर सुरू केला आहे. विविध कर्ज/क्रेडिट सुविधा खात्यांमधील सध्याची थकबाकी आणि अशा दायित्वासाठी तयार केलेले सुरक्षा हितसंबंध खालीलप्रमाणे आहेत :

सुविधांचे स्वरूप व प्रकार	मर्यादा (रु.) लाखांमध्ये	व्याजदर	०८.०२.२०२६ रोजी थकबाकी (रुपयांमध्ये) (०८.०२.२०२६ पर्यंत व्याजासह)		सिक्युरिटीजच्या संक्षिप्त वर्णनासह सुरक्षा करार
कॅश क्रेडिट	०.००	१ वर्ष एमसीएलआर+ ६.२५%+ एसपी	प्रमुख	१४७.५०	१. श्री. हितेश परमानंद आश्रानी यांच्या नावावर, एनए जमिन प्लॉट (प्लॉट क्र. १०, १५, १६, १७, १८) येथील सर्व्हे क्र. ४०५/१ भाग + १ बी, गाव खराडा, ता. शाहपूर, जिल्हा ठाणे -४२१६०१, मोज. २९५३.७८ चौ. मीटर असलेली मालमत्ता. २. फ्लॅट क्रमांक ४०७, चौथा मजला, बी विंग, ४०.०७ चौ. मीटर (कार्पेट), सत्यम सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड, एकसर गाव, लिंक रोड येथे, एमएचबी पोस्ट ऑफिससमोर, जयराज नगर जवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१, श्री. पंकज रमेशचंद्र व्यास आणि श्रीमती वैशाली पंकज व्यास यांचे आहे.
			व्याज	७७.५१	
			दंडात्मक व्याज	१०.१२	
			एकूण	२३५.१३	
डब्ल्यूसीटीएल	५००.००	बीआरएलएलआर + १.२५%	प्रमुख	४०२१९३१९.८८	
			व्याज	१३३३७६८३.३०	
			दंडात्मक व्याज	२५८६०६६.०७	
			एकूण	५६१४३०६९.२५	
एफआयटीएल-कोव्हिड	१३.००	बीआरएलएलआर + ०.७५%	प्रमुख	९२५६६८.३७	
			व्याज	३४५७२१.९५	
			दंडात्मक व्याज	६६४१३.२१	
			एकूण	१३३७०३.५३	
बीजीईसीएल योजना	१००.००	बीआरएलएलआर + १%	प्रमुख	१००००००.००	
			व्याज	३४४२१७४.८६	
			दंडात्मक व्याज	७०९३००.९१	
			एकूण	१४१५१४७५.८७	
एकूण	६१३.००		प्रमुख	५,११,४५,१३५.७५	
			व्याज	१,७१,२५,६५६.७२	
			दंडात्मक व्याज	३३,६१,७९०.३०	
			एकूण	७,१६,३२,५८३.७७	
			रक्कम शब्दांमध्ये - रु. सात कोटी सोळा लाख बत्तीस हजार पाचशे त्र्याऐंशी व सत्याहत्तर पैसे.		

२. ३१.०३.२०२१ रोजीच्या कर्जाच्या पावती पत्रात, तुम्ही ३०.०३.२०२१ रोजी बँकेला तुमचे रु. ५,१३,००,०००/- इतके दायित्व असल्याचे मान्य केले आहे. वर नमूद केलेल्या थकबाकीमध्ये ०८.०२.२०२६ पर्यंतचे